# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.04.2024** **वारःसोमवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात राज्यातल्या 11 मतदारसंघात 317 उमेदवारी अर्ज वैध
2. तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस
3. राज्याच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आणि
4. दृष्टिहीन विद्यार्थ्यांनाही हिमशिखरांची साद; पुण्यातले पंचवीस विद्यार्थी पुढच्या महिन्यात हिमालयाच्या मोहिमेवर

**अर्ज छाननी राज्य**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठीचं मतदान 7 मे रोजी होणार आहे. त्यासाठी राज्यातल्या 11 मतदारसंघातल्या 361 उमेदवारांचे 522 अर्ज दाखल झाले होते. अर्ज छाननीनंतर 317 अर्ज वैध ठरल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. मतदारसंघनिहाय वैध ठरलेल्या अर्जांची संख्या, रायगडमध्ये- 21, बारामतीमध्य- 46, उस्मानाबाद- 35, लातूर- 31, सोलापूर- 32, माढा- 38, सांगली- 25, सातारा- 21, रत्नागिरी-सिंधुदुर्ग- 9, कोल्हापूर- 27 आणि हातकणंगले- 32 अशी आहे.

**अर्ज छाननी-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातल्या सोलापूर आणि माढा या दोन लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारांच्या अर्जांची शनिवारी छाननी करण्यात आली. त्यामध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील आणि संस्कृती सातपुते यांचे उमेदवारी अर्ज अवैध ठरले आहेत. त्याचबरोबर माढा मतदारसंघातल्या 4 तर सोलापूर मतदारसंघातल्या 9 उमेदवारांचे 10 उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरवले आहेत.

**अर्जमागे**

दरम्यान तिसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आज संध्याकाळपर्यंत तिसऱ्या टप्प्यातील सर्वच लोकसभा मतदार संघातील लढतीचं चित्र स्पष्ट होईल.

**चोकलिंगम**

पुणे जिल्ह्यातल्या चारही मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढावा आणि नागरिकांना शांततापूर्ण वातावरणात मतदान करता यावे यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, त्यासाठी केंद्रांवर आवश्यक त्या सुविधा पुरवाव्यात आणि त्याची माहिती मतदारांना द्यावी असं निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात काल आयोजित करण्यात आलेल्या निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. आगामी लोकसभा निवडणुका मुक्त, निर्भय, आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व घटकांनी समन्वयानं काम करावं, असंही चोक्कलिंगम यांनी सांगितलं. निवडणूक प्रक्रिया सुरू असताना कायदा आणि सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होणार नाही यावर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या.

**मतदान वॉकेथॉन-नांदेड**

नांदेड जिल्ह्यात काल प्रशासन आणि क्रीडा कार्यालयाच्या वतीनं मतदान जनजागृतीसाठी वॉकेथॉन रॅली काढण्यात आली होती. जिल्हाधिकारी अभिजित राउत यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला, तसंच त्यांच्या हस्ते सेल्फी पॉईंटचा शुभारंभ करण्यात आला. यात सहभागी झालेल्या नवमतदार तसंच खेळांडूनी, नांदेडकरांना, मतदान करण्याचं आवाहन केलं.

**स्वीप नकाशा-अकोला**

अकोला जिल्ह्यात स्वीप कार्यक्रमांतर्गत 2 हजार शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी मिळून, अकोला जिल्ह्याचा नकाशा साकारत, मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली. मतदानाचं 75 टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन आयोजित करत असलेल्या कार्यक्रमापैकी हा एक कार्यक्रम होता. यावेळी जिल्हाधिकारी अजित कुंभार उपस्थित होते.

**<u>मद्यजप्त-परभणी</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर परभणी जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागानं मार्च आणि एप्रिल महिन्यात केलेल्या कारवाईत 21 लाख 75 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**<u>नड्डा-बुलडाणा</u>**

राज्याच्या विविध जिल्ह्यात सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. बुलडाणा जिल्ह्यातल्या संग्रामपूर तालुक्यातले महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी काल जाहीर सभेला संबोधित केलं. भाजपानं गेल्या दहा वर्षात सर्वसामान्यांसह, महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीनं धोरणात्मक निर्णय घेतले असल्याचं प्रतिपादन नड्डा यांनी केलं. देशातल्या पाच कोटी नागरिकांना आवास योजनेतून पक्की घरे उपलब्ध करुन दिल्याचंही नड्डा यावेळी म्हणाले. इंडिया आघाडी मधील उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्या घराणेशाहीमुळेच त्यांच्या पक्षात फूट पडल्याची टीका नड्डा यांनी यावेळी केली.

**<u>गडकरी-नांदेड</u>**

केवळ शेती उत्पादनांवर शेतकऱ्यांना समृद्धी लाभणार नसून, शेतकऱ्यांना अन्नदाता, उर्जादाता, इंधनदाता बनवण्याची गरज असल्याचं मत केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते नीतीन गडकरी यांनी काल व्यक्त केलं. नांदेड जिल्ह्यात मुखेड इथं भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील-चिखलीकर यांच्या प्रचारार्थ सभेला संबोधित करताना गडकरी बोलत होते. त्यानंतर गडकरी यांची देगलूर इथंही सभा झाली. विकासासाठी भाजपच्या पाठीशी उभं राहाण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<u>गडकरी-हिंगोली</u>**

नीतीन गडकरी यांची काल हिंगोलीत महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचारार्थ सभा झाली. कॉंग्रेसच्या कार्यकाळात देशाचा विकास झाला नसल्याची टीका गडकरी यांनी यावेळी बोलताना केली, तसंच विरोधकांकडे मतं मागण्यासाठी मुद्दे नसल्याचं सांगून, विरोधक, राज्यघटना बदलली जाण्याचा अपप्रचार करत असल्याचंही ते म्हणाले.

**<u>पृथ्वीराज चव्हाण</u>**

पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी काँग्रेसचे प्रदेश प्रचार प्रमुख पृथ्वीराज चव्हाण यांनी काल पुण्यात पत्रकार परिषद घेतली. कॉंग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह पक्षाचे अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. निवडणुक रोख्यांच्या माध्यमातून देशातील सर्वात मोठा घोटाळा झाला असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. देशात इंडीया आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही निवडणुक रोखे प्रकरणाचा तपास करू, असंही ते म्हणाले. सांगलीची जागा काँग्रेसला मिळावी, तिथे विशाल पाटील यांना उमेदवारी मिळावी, यासाठी आम्ही शेवटपर्यंत आग्रही होतो. मात्र आता सर्वांनी एकत्र येवून लढणे गरजेचे आहे, विशाल पाटील माघार घेतील अशी आशा असल्याचं पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितलं. दरम्यान महायुतीच्या विविध नेत्यांनी पुरंदर तालुक्यात सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराला काल सुरुवात केली.

**<u>प्रचारगीत-मुंबई</u>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या प्रचारगीतातून हिंदू धर्म आणि जय भवानी हे शब्द वगळण्याच्या सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. मात्र आयोगाच्या सुचनेचं पालन न करता त्याविरोधात न्यायालयीन लढा देणार असल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं. 'जय भवानी' या शब्दाचा उल्लेख एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या प्रचार गीतामध्येही आला होता. तो देखील वगळण्याची सूचना निवडणूक आयोगाच्या समितीनं केली होती. त्यासाह इतर धार्मिक उल्लेख वगळून पुन्हा नवं गीत सादर झाल्यानंतर समितीनं त्याला मंजुरी दिल्याचं सुत्रांनी सांगितलं. तसंच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं तसंच राज ठाकरे यांच्या मनसेनंही सादर केलेल्या काही जाहिरातींमध्येही विविध प्रकारचे धार्मिक चिन्हं, फोटो होते. ते वगळण्याची सूचना निवडणूक आयोगाच्या समितीनं केली आहे, असं सुत्रांनी सांगितलं.

**<u>महावीरजयंती-पुणे, रायगड, सांगली, अहमदनगर, नवी मुंबई</u>**

जैन तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती काल जैन समाजबांधवांनी राज्यात विविध उपक्रमांनी साजरी केली. बोईसर, पालघर, अहमदनगर, सांगली, पुणे, वाशी या शहरांमध्ये यानिमित्ताने शोभायात्रा काढण्यात आल्या. वाशी इथल्या जैन मंदिरात भगवान महावीर यांच्या शिकवणीचं स्मरण करण्यात आलं. सांगलीत कच्छी जैन भवन इथं आय़ोजित रक्तदान शिबिरात189 जणांनी रक्तदान केलं. तर सिव्हिल हॉस्पिटल इथं फळ वाटप करण्यात आलं. पुण्यात ठिकठिकाणी जन्म कल्याणक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. शहरातील जैन स्थानकांमध्ये रक्तदान शिबिर घेण्यात आलं; या निमित्ताने हिंदी विवेक प्रकाशित 'तीर्थंकर भगवान महावीर' विशेषांकाचं प्रकाशनही करण्यात आलं.

**<u>अंधविद्यार्थी-गिरीप्रेमी</u>**

प्रत्येक गिर्यारोहकाला हिमालय साद घालत असतो. दिव्यांग व्यक्तीही यात मागे नाहीत. आता एक पाऊल पुढे टाकत अंध विद्यार्थी हिमालय सर करणार आहेत. पुण्यातल्या ममता अंध-अनाथ कल्याण केंद्रातले पंचवीस विद्यार्थी गिरीप्रेमी संस्था आणि स्वरुप संस्थेच्या सहकार्यानं 17 ते 23 मे दरम्यान या मोहिमेवर जाणार आहेत. या मोहिमेत सहभागी होणारा विद्यार्थी अक्षय गंगावणे याने आकाशवाणीशी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या...

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आजपासून पुढील तीन दिवस तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तर, विदर्भात गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.
## नमस्कार.